दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB Racold legrand HAVELLS L&T SWITCHGEAR INDOASIAN
Finolex KOLORS USHA PHILIPS GreatWhite SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com

लातूर वर्ष ३ रे अंक २९४ वा शुक्रवार दि.०३ मे २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# मतदारांना प्रत्यक्ष भेटून विकास योजनांची माहिती द्या : खा. प्रतापराव पाटील चिखलीकर

लोहा/ प्रतिनिधी : देशाला पंतप्रधान मोदी यांच्यासारखे खंबीर नेतृत्व हवे आहे. त्यांना तिसर्यांदा पंतप्रधान करण्यासाठी कार्यकर्त्यांनी मागील दहा वर्षात राबविलेल्या विकास योजनांची माहिती मतदारांना प्रत्यक्ष भेटून द्यावी. लोहा विधानसभा क्षेत्रात खा. सुधाकर शृंगारे यांना मताधिक्य देण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत असे आवाहन खा. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केले. भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाई आठवले गट, कवाडे गट, मनसे, रासप, महायुतीचे लातूर लोकसभा मतदारसंघातील उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांच्या प्रचारार्थ लोहा येथील व्यंकटेश गार्डनमध्ये बुथ प्रमुख व प्रमुख पदाधिकार्यांची संवाद बैठक खा. चिखलीकर यांच्या उपस्थितीत पार पडली. या बैठकीस मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी उमेदवार खा. सुधाकर शृंगारे, मराठवाडा संघटक संजय कौडगे, माजी आमदार गोविंद केंद्रे, तुकाराम वारकड, देविदास राठोड, रिपाईचे विजय सोनवणे, माणिकराव मुकदम, माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार, सचिन पाटील चिखलीकर, बाबुराव केंद्रे उमरगेकर, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष मनोहर पाटील भोसीकर,भाजपा तालुकाध्यक्ष किशनराव डफडे, लोहा तालुकाध्यक्ष आनंदराव पाटील ढाकणीकर, चित्ररेखाताई गोरे, सदाशिव अंभोरे, मिलिंद शिराढोणकर, दत्ता वाले, संजय देशमुख, भगवान राठोड, औरादकरताई, जयश्रीताई मामीडवार, केशवराव मुकदम, छत्रपती धुतमल, दता वाले, करीम शेख जफारोद्दीन बाहोद्दीन, गणेश सावळे, सुभाष गायकवाड, केरबा वडवळे, बालाजी खिल्लारे, नरेंद्र गायकवाड, उत्तम सोनकांबळे, प्रकाश तोटावार, मधुकर डांगे, गणेश उबाळे, सुरेश महाबळे, चेतन केंद्रे, अप्पाराव पवार, मामा गायकवाड, सुरेश गायकवाड, प्रवीण धुतमल यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होते. खा.चिखलीकर म्हणाले की, ही निवडणूक देशाची आहे. खा. शृंगारे यांनी या मतदार संघासाठी भरपूर निधी दिला आहे. मोदी यांना तिसर्यांदा देशाचे पंतप्रधान करायचे आहे. यासाठी कार्यकर्त्यांनी आळस झटकून कामाला लागले पाहिजे. मागील निवडणूकीत जे मताधिक्य दिले त्यापेक्षा अधिकचे मताधिक्य यावेळी मिळाले पाहिजे.यावेळी बोलताना उमेदवार खा. शृंगारे यांनी आपण या मतदारसंघासाठी मोठ्या प्रमाणात विकासनिधी दिला आहे. खा. चिखलीकर व परिवाराने मला नेहमीच साथ दिली आहे. यावेळीही मागील निवडणुकी प्रमाणेच मताधिक्य द्याल, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.यावेळी माजी आ. गोविंद केंद्रे, तुकाराम वरकड, माणिकराव मुकदम, रिपाई प्रदेश उपाध्यक्ष विजय सोनवणे, बालाजी धनसडे, औरादकार यांचीही भाषणे झाली. प्रास्ताविक विधानसभा अध्यक्ष प्रवीण पाटील चिखलीकर यांनी केले तर संचलन व आभार प्रदर्शन भास्कर पवार यांनी केले.






## महायुतीचे उमेदवार खा.सुधाकर श्रृंगारे यांच्या प्रचाराथ माजी आ. कव्हेकर यांचा लातूर ग्रामीण दौरा

लातूर दि.०२-०५-२०२४ विरोधकांनी जे सत्तर वर्षात केले नाही. ती विकासकामे दहा वर्षात पूर्ण करून विकासाचा ऐतिहासिक पॅटर्न निर्माण केला. त्या सर्व विकास कामाची माहिती जनसामान्यापर्यंत पोहचावी यासाठी भाजपा नेते तथा किसाना मोर्चा गोवा व गुजरात राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टी, शिंदे गट, राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा पवार गट, रिपाई आठवले गट, रासप व मित्रपक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार खा.सुधाकर श्रृंगारे यांच्या प्रचारार्थ लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघामध्ये ३ मे ते ५ मे २०२४ या कालावधीत लातूर ग्रामीण मतदार संघातील विविध ठिकाणी प्रचार सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे.महायुती उमेदवाराच्या प्रचार दौर्यामध्ये ३ मे रोजी २०२४ रोजी सकाळी ८.०० वा कव्हा, ९.३० वा सिकंदरपूर, सायंकाळी ६.३० वा.ममदापूर, रात्री ८.०० वा महापूर या ठिकाणी महायुतीचे उमेदवार खा.सुधाकर श्रृंगारे यांच्या प्रचारार्थ विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आलेले आहे. ०४ मे २०२४ रोजी सकाळी ८.०० वा हरंगुळ(खूर्द), सकाळी ९.३० वा.एकूर्गा, सायंकाळी ६.३० वा गोंदेगाव, रात्री ८.०० वा तांदुळजा या ठिकाणी बैठका घेण्यात येणार आहे तर ५ मे २०२४ रोजी सकाळी ८.०० वा.रेणापूर तालुक्यातील बिटरगाव व सकाळी ९.३० वा रेणापूर येथे व्यापक बैठकीचे आयोजन करण्यात आलेले आहे.या प्रचार बैठकीच्या माध्यमातून भारत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी केलेल्या विविध विकास कामाची व विविध योजनेची माहिती सर्वसामान्य नागरिक व मतदारापर्यंत पोहचविली जाणार आहे. त्यामुळे महायुतीचे उमेदवार खा.सुधाकर श्रृंगारे यांच्या प्रचारार्थ आयोजित बैठकांना भाजपा व मित्र पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येनी उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आलेले आहे.

## आमदार धिरज देशमुख यांची गावागावात पदयात्रा नागरिकांच्या गाठीभेटी घेवून डॉ. शिवाजी काळगे यांना विजयी करण्याचे आवाहन






लातूर / प्रतिनिधी : लातूर लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने लातूर ग्रामीणचे आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी लातूर तालुक्यातील महमदापूर, भडी, बोरगाव बु., शिराळा येथे पदयात्रा काढून काँग्रेस पक्षाच्या गॅरंटी कार्डचे वाटप केले. ग्रामस्थांच्या घरोघरी भेटी घेऊन डॉ. शिवाजी काळगे यांना विजयी करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.महमदापूर, भडी, बोरगाव बु., शिराळा येथे काढण्यात आलेल्या पदयात्रेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. जागोजागी औक्षण करून, पुष्पवृष्टी करून नागरिकांनी पदयात्रेचे स्वागत केले. काँग्रेस पक्षाचे गॅरंटी कार्ड नागरिकांना देवून आमदार धिरज देशमुख यांनी देशात ऐतिहासिक बदल घडवून आणू पाहणाऱ्या काँग्रेसच्या २५ कलमी कार्यक्रमाची माहिती दिली.यावेळी अनुप शेळके, सुभाष घोडके, सुनील पडिले, सतीश पाटील, संभाजी रेड्डी, जयचंद भिसे, दगडूसाहेब पडिले, ज्ञानोबा गवळे, अनिल पाटील, अरुण वीर, जनार्दन थोरमोटे, दिपक काळे, अंकुश बनसोडे, जनार्दन वंगवाड, अंकुश शेळके, रमेश देशमुख, नवनाथ काळे,भगवान देशमुख, पांडुरंग वीर, वसंत पाटील, श्रीकृष्ण काळे, विशाल पाटील, ज्ञानोबा काळे, लिंबराज काळे, अजय काळे, पुरुषोत्तम काळे, परमेश्वर पाटील, मेघराज पाटील, जब्बार सय्यद, माधव वीर, धनंजय बाचपल्ले, रमेश सुरवसे, ज्ञानोबा वीर, सुरेश काळे, रमेश काळे, अच्युतराव काळे, जगदीश चोरमले, शिवराज गव्हाणे, मुरलीधर सोळुंके, उत्तम वीर, गणेश पाटील, विनोद वीर, संतोष वीर, दत्तात्रय वीर, संदीप वीर, व्यंकट गव्हाणे, किशन गव्हाणे, प्रल्हाद जाधव, कैलास काळे, भारत आदमाने, सतीश काळे, सतीश जाधव, परमेश्वर काळे, बापूसाहेब देशमुख, चंद्रकांत डोपे, दीपक पाटील, रमाकांत वंगवाड आदी उपस्थित होते.

## विकासपुरूष नितीन गडकरी यांची आज निलंग्यात सभा

निलंगा/प्रतिनिधीः भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाई आठवले गट, कवाडे गट, मनसे, रासप, महायुतीचे लातूर लोकसभा मतदारसंघातील उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांच्या प्रचारासाठी केंद्रीय दळण-वळण व रस्ते वाहतूक मंत्री विकासपुरूष नितीन गडकरी यांची शुक्रवारी (दिनांक ३) सकाळी १०.३० वाजता शिवाजी विद्यालयाच्या मैदानावर भव्य सभा होणार आहे.या सभेस लोकसभा संयोजक माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर, क्रीडा मंत्री संजय बनसोडे, आ. बाबासाहेब पाटील, माजी खासदार रूपाताई पाटील निलंगेकर, युवा नेते अरविंद पाटील निलंगेकर, डॉ. अर्चनाताई पाटील चाकुरकर, लोकसभा प्रभारी किरण पाटील, माजी आ. सुधाकर भालेराव, माजी आ. गोविंद केंद्रे, माजी आ.बब्रूवान खंदाडे, भाजपा जिल्हाध्यक्ष दिलीप देशमुख, शिवसेना जिल्हाप्रमुख शिवाजी माने, प्रदेश प्रवक्ते गणेश हाके यांच्यासह महायुतीचे सर्व प्रमुख नेते उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.निलंगा विधानसभा मतदारसंघातील नागरिकांनी या सभेस मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन महायुतीच्या वतीने करण्यात आले आहे.



## ऋषिकेश कराड यांच्या समसापुर, शेरा, भोकरंबा येथे मतदार गाठीभेटी



रेणापूर/प्रतिनिधी : भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाई आठवले गट, कवाडे गट, मनसे, रासप, महायुतीचे लातूर लोकसभा मतदारसंघातील उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांच्या प्रचारार्थ भाजपाचे युवा नेते ऋषिकेश कराड यांनी तालुक्यातील समसापूर, शेरा, भोकरंबा येथे मतदारांच्या गाठी-भेटी आणि प्रचार बैठका घेतल्या.ठिकठिकाणी आयोजित प्रचार बैठकीत कराड म्हणाले की, देश हितासाठी आणि मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी खा. सुधाकर शृंगारे यांना विजयी करणे आवश्यक आहे. देशात ज्या पध्दतीने विकास कामे केली जात आहेत त्याच पध्दतीने आपल्या भागातही विकास होत आहे. आ. रमेश कराड यांच्या माध्यमातून लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील विविध विकास कामाची माहिती त्यांनी दिली. भविष्यातही विकासाचा वेग वाढविण्यासाठी भाजपाला साथ द्यावी, असेही ते म्हणाले.या बैठकांत भाजपाचे विधानसभा अध्यक्ष अनिल भिसे, तालुकाध्यक्ष दशरथ सरवदे, शिवसेनेचे जिल्हा युवा प्रमुख कुलदीप सूर्यवंशी, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष अमर चव्हाण, विस्तारक दिलीप पाटील, श्रीकृष्ण पवार यांच्यासह अनेकांनी आपले मनोगत व्यक्त केले.

## भाजपा महायुतीच्या प्रचार रॅलीत कार्यकर्त्यांचा मतदारांशी थेट संवाद







उदगीर/प्रतिनिधी : भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाई आठवले गट, कवाडे गट, मनसे, रासप, महायुतीचे लातूर लोकसभा मतदारसंघातील उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांच्या प्रचारार्थ भाजपचे शहराध्यक्ष मनोज पुदाले यांच्या नेतृत्वात शहरात प्रचार रॅली काढण्यात आली. यावेळी भाजपा महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मतदारांशी थेट संवाद साधला.भाजपा महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांच्या प्रचारार्थ शहरातील विविध धार्मिक स्थळांना भेटी देऊन गुरूंचे दर्शन घेण्यात आले. यावेळी श्री गुरू हावगीस्वामी मठ, श्री शंकरलिंग महाराज मठ, श्री सिद्धरामेश्वर मठ व चौकी मठ येथील मठाधिशांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले.

रॅलीच्या माध्यमातून नागरिकांशी घरोघरी जाऊन संवाद साधत प्रचारपत्रक देण्यात आले.या प्रचार रॅलीला मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.यावेळी बोलताना माजी नगरसेवक ॲड. दत्ताजी पाटील यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राबविलेल्या विविध योजनांचा लाभ घराघरात पोहोचला असल्याने मतदार भाजपा महायुतीच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून भाजपाचा विजय निश्चित असल्याचे सांगितले.यावेळी भाजपचे पक्ष निरीक्षक रामदास पाटील, शहराध्यक्ष मनोज पुदाले, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा उत्तरा कलबुर्गे, शिवानंद हैबतपुरे, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमोल निडवदे, माजी नगरसेवक ॲड. सावन पस्तापुरे, शहाजी पाटील, आनंद बुंदे, रुपेंद्र चव्हाण, डॉ चंद्रकांत कोठारे, अमोल अनकल्ले, अरुणा चिमेगावे, गणेश गायकवाड, उदयसिंग ठाकूर, महिला मोर्चा शहराध्यक्ष शिल्पा इंगळे, युवा मोर्चा शहराध्यक्ष रामेश्वर चांडेश्वरे, सुनील गुडमेवार, सुजित जीवने, मारुती कोटलवार, रमाबाई वाघमारे, बबिता पांढरे, वर्षा धावारे, कृपा सुर्यवंशी, शिवकर्णा अंधारे, संजय पांढरे, रोहित लोहकरे, गणेश पांढरकर, अनिकेत गुडमेवार, आदीसह महिला व कार्यकर्ते उपस्थित होते.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# प्रश्न परदेशात जाणार्यांच्या सुरक्षिततेचा

भारतामधून शिक्षण, नोकरी, व्यवसायाच्या निमित्ताने अमेरिका, कॅनडा, ब्रिटन, जर्मनी, इराण, इस्त्रायल आदी देशांमध्ये जाणार्यांची संख्या मोठी आहे. विशेष म्हणजे, आपण विकासाचे गोडवे कितीही गात असलो, तरी शिक्षण-उच्चशिक्षण घेतलेल्यांना त्यांच्या पात्रतेनुसार, क्षमतेनुसार भारतात रोजगार मिळतोच, असे नाही. त्यामुळे अनेक भारतीय परदेशाची वाट धरतात. यासाठी अनेकजण बेकायदेशीर मार्गांचाही वापर करतात. परदेशातील भारतीयांच्या अनेक समस्या असतात. नवा देश, परकी भाषा, वेगळे लोक, वेगळे कायदे, सामाजिक जीवनात शिस्त, आगळी जीवनशैली या गोष्टी भारतीयांना सतावतात. त्यातून मानसिक तणाव वाढतात. प्रत्येकाला तिथले हवामान किंवा अभ्यास पद्धती मानवतेच, असे नाही. याखेरीज आपली जन्मभूमी सोडून सातासमुद्रापार गेल्यानंतर काही चुकीच्या मार्गाला लागण्याची आणि त्यातून परदेशातील माहीत नसलेल्या कायद्याच्या कचाट्यात सापडण्याची शक्यता असते. तिथे पावलापावलावर असे अनेक धोके असतात. ते ओळखता आले पाहिजेत, विविध धोक्यांपासून स्वतःचे रक्षण करता आले पाहिजे. गेल्या काही महिन्यांमध्ये परदेशामध्ये वेगवेगळ्या कारणांसाठी गेलेल्या भारतीयांच्या सुरक्षेविषयी एक मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अमेरिकेमध्ये अनेक विद्यार्थी आणि भारतीय नागरिक तेथील कायदा-सुव्यवस्थेतील हलगर्जीपणामुळे मारले गेल्याचे समोर आले आहे. अमेरिका, कॅनडा, ग्रेट बि-टनमध्ये हिंदूंच्या मंदिरांवरही अनेक हल्ले झाले. रशियामध्ये काम करण्याकरिता गेलेल्या भारतीयांना रशियन सैन्यात भरती करून युक्रेन युद्धभूमीवर पाठवल्याचेही मध्यंतरी समोर आले आहे. याखेरीज अनेक भारतीय बेकायदेशीररीत्या अमेरिकेमध्ये प्रवेश करण्याच्या प्रयत्नामध्ये मेक्सिको सीमेवर बळी पडले आहेत. मात्र, यादरम्यान एक सर्वात धक्कादायक बातमी समोर आली. ती म्हणजे कंबोडिया, लाओस आणि थायलंडमध्ये गेलेल्या अनेक भारतीयांना बंधक बनवून थायलंड आणि लाओसमध्ये बेकायदा कामे करण्यासाठी तेथील क्राईम सिंडिकेट भाग पाडत आहेत. शिक्षणासाठी, नोकरी वा उद्योग-व्यवसायासाठी आणि कुंपणापलीकडचे सुंदर जग जगण्यासाठी भारतीय विदेशात जातात. विशेषतः, अमेरिका, इंग्लंड अशा देशांमध्ये जाण्यासाठी अनेकजण एजंटांना पैसे देतात. या एजंटना कोणतीही कायदेशीर अधिमान्यता नसते; पण परदेशात जाण्याचे आपले स्वप्न विनासायास किंवा कमीत कमी त्रासात पूर्ण व्हावे, यासाठी अशा एजंट मंडळींची मदत घेतली जाते. घर आणि शेत विकून, सर्वस्व पणाला लावून लोक या एजंटना भरमसाट पैसे देतात आणि परदेशात जाण्याचा प्रयत्न करतात. त्यासाठी अवैधपणे, कधी कधी गोठवणार्या थंडीत कित्येक तास ट्रकमध्ये बसून किंवा तासन्तास बर्फात चालून अमेरिकेत वा युरोपात सीमा पार करून घुसण्याचा प्रयत्न करतात. आजवर हजारो भारतीय बेकायदेशीररीत्या अमेरिकेत प्रवेश करताना पकडले गेले आहेत.दुसरीकडे, यावर्षीच्या पहिल्या तीन महिन्यांत एकट्या अमेरिकेत १२ विद्यार्थ्यांच्या मृत्यूच्या घटना घडल्या. साधारणत:, एकूण २० लाख भारतीय विद्यार्थी विदेशात शिक्षण अथवा नोकरीनिमित्त वास्तव्यास असण्याची शक्यता आहे.एका कंपनीमध्ये सुमारे ३० भारतीय तरुण काम करत होते. त्यांच्यावर जाचक अटी लादून त्यांचा पगार कापण्यात येत होता. जाचाला कंटाळून तरुणांनी तेथील भारतीय वकिलातीशी संपर्क साधून हा सर्व प्रकार सांगितला. त्यानंतर त्यांचे मोबाईल काढून घेतले गेले. तसेच भारतीय वकिलातीकडे केलेली तक्रार मागे घेण्यासाठी त्यांच्यावर दबाव आणला गेला. मोबाईलमधील सर्व तपशीलही डिलिट केला गेला. युवकांकडून २,००० चिनी युआन खंडणी म्हणून काढून घेतले. अडकलेल्या तरुणांनी स्थानिक भारतीय वकिलातीकडे तक्रार केल्यानंतर १ एप्रिलला सुटका केली. मात्र, अजून अनेक भारतीय तिथे फसलेले आहेत. परदेशात नोकरीसाठी जाणार्या तीन महिलांना नुकतीच सहार पोलिसांनी अटक केली. दलालाने बनावट कागदपत्रे तयार करून त्यांच्याकडे दिली होती; पण विमानतळावर या महिलांना अडवून अटक करण्यात आली. एका प्रकरणात मुंबईतील २४ वर्षीय तरुणीला हॉटेलमध्ये नोकरी लावण्याचे आमिष दाखवून बहारीनला पाठवले होते, तेथे दोन-तीन महिने तिला काम दिल्यानंतर तिचा मोबाईल व पारपत्र काढून घेऊन तिला वेश्या व्यवसायात ढकलले.अचानक मुलीचा संपर्क तुटल्यामुळे कुटुंबीयांनी पोलिसांत धाव घेऊन मुलगी बेपत्ता असल्याची तक्रार केली होती. त्यानंतर तिला परदेशात पाठवणार्या टोळक्याने तिच्या सुटकेसाठी दोन लाख रुपये मागितले. पैसे देऊन कुटुंबीयांनी मुलीची सुटका केल्यानंतर या टोळक्याने नेपाळ व भारतातून ६०० मुलींना अशाप्रकारे बहारीनला वेश्या व्यवसायासाठी पाठवल्याचे उघड झाले. जरी भारताची अर्थव्यवस्था वेगाने वाढते आहे, तरी सरकारी आकड्यांनुसार केवळ १५ ते २० टक्के तरुणांना दरवर्षी नोकर्या मिळतील. बाकीच्यांना दुसरे काही तरी म्हणजे उद्योगधंदा, शेती, इतर व्यवसाय स्वतःच्या उदरनिर्वाहासाठी करावे लागतात. त्यासाठी स्किल इंडियाद्वारे बहुतेक तरुणांना नवीन कौशल्ये शिकावी लागतील.अनोळखी व्यक्तींमार्फत परदेशात नोकरीला जाणे धोक्याचे ठरू शकते. त्यामुळे दलालांमार्फत परदेशात नोकरीसाठी जाताना पूर्ण पडताळणी करणे आवश्यक आहे. कंपनीची माहिती, तेथे काम करणारे कर्मचारी, संबंधित देशात काम करणार्या परिचित व्यक्तींकडून पडताळणी करावी. परदेशात फसवणूक झाल्यास तेथील भारतीय वकिलातीशी संपर्क साधावा. परदेशात गेल्यानंतर पारपत्र व इतर महत्त्वाची कागदपत्रे अनोळखी व्यक्तीला देणे टाळावे, भारतातही अनोळखी व्यक्तीकडे कागदपत्रांच्या मूळ प्रती देऊ नयेत. त्या द्यायच्या झाल्यास पूर्ण पडताळणी करावी. सर्वात महत्त्वाचे-परदेशामध्ये प्रत्येक भारतीय वकिलातीमध्ये त्या देशात राहणार्या भारतीयांची नोंदणी आवश्यक आहे.

# उमेदवारभाऊ, तुही जात कंची ?

शहरी राजकारण हे जरी राजकारणी गँगस्टर आणि गँगस्टर राजकारण्यांच्या हातात आहे, तरी त्यांना यश मिळवण्यासाठी निवडणूका जिंकाव्या लागतात आणि यासाठी त्यांना मतदार याद्यांचे विश्लेषण वर्गवार नाही , जात जमातवार करावे लागते - कॉम्रेड शरद पाटील कॉम्रेड शरद पाटील यांनी विसाव्या शतकाच्या शेवटी शहरी राजकारणावर जे भाष्य केले होते, ते आजही तंतोतंत लागू होते. शहराबरोबरच ग्रामीण भागालाही ते लागू पडतं. राजकीय पक्ष मतदारांची डोकी जातीच्या आधारावर मोजतात, हे वास्तव मतदारांनीदेखील मान्य केले आहे पण पक्षांनी उमेदवारीमध्ये विविध जातसमूहांना योग्य प्रतिनिधित्व दिले की नाही, हे तपासण्याइतका आपला मतदार अजूनतरी शहाणा नाही झाला, असेच म्हणावे लागेल काय? वंचित बहुजन आघाडीने लोकसभा उमेदवारांची नावे जातीसकट जाहीर केली आणि समाजमाध्यमांत विविध प्रकारच्या प्रतिक्रिया उमटू लागल्या. काहींनी या नव्या प्रयोगाचे स्वागतसुद्धा केले, तर काहींनी जातीअंताची लढाई लढणाऱ्यांनीच स्वतःच्या उमेदवाराच्या नावापुढं जात घोषित का करावी असा प्रश्न उपस्थित केला.खरंतर प्रकाश आंबेडकर यांनी हे पहिल्यांदाच केले आहे असे नाही. २०१९ ला वंचित बहुजन आघाडीने निवडणुकांमध्ये उमेदवारी जाहीर करतानासुद्धा जातीसकटच यादी दिली होती. प्रकाश आंबेडकर यांना सामाजिक आणि राजकीय चळवळीचा चार दशकांचा प्रदीर्घ अनुभव आहे. त्यांची आजवरची कार्यशैली बघता त्यांनी हे जाणीवपूर्वक केले आहे. त्यातून त्यांना राज्याच्या राजकीय परिसंस्थेला एक संदेश द्यायचा आहे.५० च्या दशकात पिछड़ा पावे सौ में साठ चा नारा देत समाजवादी नेते राममनोहर लोहिया यांनी ओबीसी, अनुसूचित जाती आणि जमातींना सत्तेत भागीदार बनवण्याचा नारा दिला. पुढे त्यांचेच शिष्य भारतरत्न कर्पूरी ठाकूर यांनी बिहारच्या सरकारमध्ये सामाजिक न्यायाचा पॅटर्न अंमलात आणला. महात्मा फुले यांनी 'नाही रे' वर्गाच्या सत्तेतल्या भागिदारीची मागणी केली ती आता देशभर जोर धरतेय.८० च्या दशकात उत्तर प्रदेशमध्ये बहुजन समाज पार्टीचे सर्वेसर्वा कांशीराम यांनी जिसकी जितनी संख्या भारी, उसकी उतनी हिस्सेदारी हा नारा दिला आणि ठाकूर-ब्राम्हण, बनिया जातींचे वर्चस्व असणाऱ्या उत्तर प्रदेशसारख्या राज्यात बसपाला तीनदा सत्तेत आणले. त्यापैकी एकदा समाजवादी पक्षासोबत तर दुसऱ्यांदा भाजपबरोबर आघाडी सरकार स्थापले. ही आघाडी सरकारे स्थापन करताना त्यांनी बहुजन समाजामधील जातीच्या गणिताची जुळवाजुळव करण्याची काळजी घेतली. तिसऱ्यांदा मायावतींनी स्वबळावर सरकार आणले. प्रकाश आंबेडकरांचे राजकारण देखील वंचित जातसमूहाला सत्ताधारी करण्याची भाषा बोलते. याच भूमिकेतून त्यांनी मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षणाच्या आंदोलनास जाहीर पाठिंबा दिला होता. सरंजामी मराठ्यांविरोधात गरीब मराठ्यांनी उठाव करावा अशी प्रकाश आंबेडकरांची भूमिका आहे.७० वर्षे एका विशिष्ट समाजातील १५० घराणीच आळीपाळीने महाराष्ट्राची सत्ता उपभोगत आली आहेत. मिळालेल्या सत्तेचा वापर करून सहकार, शिक्षण, आरोग्य, शेतीपूरकउद्योग क्षेत्रात संस्थांचे जाळे तयार करून स्वतःचा आर्थिक उत्कर्ष साधत आहेत. यासाठी सत्ता कायम आपल्याकडेच राहावी अशी त्यांची सरंजामी मानसिकता आहे. जोपर्यंत यात बदल होत नाही तोपर्यंत गरीब मराठे, ओबीसी आणि अनुसूचित जाती जमाती फक्त मतांसाठी वापरले जाणार. विशिष्ट समाजाकडेच सत्ताबळ झुकलेले दिसतं . वंचित बहुजन आघाडीने उमेदवारी देताना जात समतोल पाळलेला दिसतो. रायगडमध्ये गवळी जातीचे सुनील तटकरे, शिरूरमध्ये माळी समाजाचे परभणीत जानकर, धनगर, बीडमध्ये पंकजा मुंडे, वंजारी हे अपवाद सोडले तर दोन्ही आघाड्यांना सामान्य मतदारसंघात मराठा/कुणबी समाजाचेच उमेदवार सापडतात असे दिसते. वंचित



परंतु त्यांना सत्तेत स्थान आणि वाटा मिळणारच नाही, अशी आंबेडकरांची मांडणी आहे.महायुती आणि महाविकास आघाडीने लोकसभा निवडणुकीला दिलेल्या उमेदवारांची जातीनिहाय यादी बघूयात.महायुती मराठा - २८ ओबीसी -६ अनुसूचित जाती -६ अनुसूचित जमाती- ४ ब्राम्हण आणि इतर सवर्ण -४ मुस्लिम आणि लिंगायत- ० महविकास आघाडी मराठा -२९ ओबीसी -७ अनुसूचित जाती- ६ अनुसूचित जमाती-४ इतर सवर्ण- २ मुस्लिम, लिंगायत- ० वंचित ३५ ठिकाणी उमेदवार त्यापैकी मराठा - ४ ओबीसी -१० अनुसूचित जाती- ७ अनुसूचित जमाती- ४ इतर सवर्ण -२ मुस्लिम- ४ लिंगायत- ४ वरील आकडेवारी बघीतली की एक गोष्ट लक्षात येते की महाविकास आघाडी असो वा भाजपप्रणित महायुती, उमेदवारी देताना एका समाजाला सामान्य मतदारसंघात प्रतिनिधित्व का मिळत नाही, हा प्रश्न कुणी विचारल्यास ते चूक ठरणार नाही.२०१४ च्या लोकसभा निवडणुकीत ( वरीलपैकी कोणीही नाही) हा पर्याय सर्वात जास्त राखीव मतदारसंघात वापरला गेला. याचा अर्थ हा निघतो की सवर्ण मतदारांना अनुसूचित जाती / जमातीचे नेतृत्व नको आहे की काय?राखीव मतदारसंघात आणखी एक पॅटर्न दिसून येतो. अनुसूचित जातीसाठी राखीव असणाऱ्या मतदारसंघात भाजपप्रणित महायुतीकडून आंबेडकरी चळवळीतील किंवा बौद्ध समाजातील कार्यकर्त्यांना लोकसभेमध्ये उमेदवारी मिळत नाही. शिवसेना आणि भाजप राखीव मतदारसंघात नेहमीच बौद्धेत्तर दलित समाजाचे उमेदवार देतात.उदाहरणादाखल शिर्डी लोकसभा मतदारसंघात १२% बौद्ध समाज आहे. हा

# अमेरिकी परराष्ट्र धोरणाचे प्रयोग..

विकसित राष्ट्र असलेल्या अमेरिकेच्या अध्यक्षीय निवडणुकीत रोटी, कपडा, मकान हे प्रचाराचे मुद्दे नसतात. तेथील मतदारांना परराष्ट्र धोरण हा सर्वात महत्त्वाचा मुद्दा वाटतो. परिणामी परराष्ट्र धोरणात अभिनव प्रयोग करणे हे उमेदवारांसाठी निकडीचे होऊन बसते.अमेरिका! गेल्या काही दशकांत संपूर्ण विश्व हे आपलेच अंगण असल्याप्रमाणे वावरण्याचा यांचा रुबाब उपजतच! मात्र सत्तेचा सारिपाट असा की काही वेळा माघार घेण्याची नामुष्कीही सत्ताधीशांवर आली. उदाहरणार्थ, १९७३ मध्ये व्हिएतनाममधून माघार, २०११ मध्ये इराकमधून तर अफगाणिस्तानातील सैन्य माघारीचा किस्सा २०२१ मधील. या सर्वात एक समान सूत्र म्हणजे ही वर्षे एकतर अमेरिकन अध्यक्षपदाच्या निवडणुकीनंतरची आहेत ज्यामध्ये सत्ताबदल झाला आहे किंवा सैन्यमाघारीनंतर वर्षभरात निवडणुका होणार होत्या. त्याच्याही आधीच्या काळात डोकावल्यास दोन्ही महायुद्धांच्या काळात युद्धातील अमेरिकेची भूमिका हाच निवडणुकीच्या प्रचाराचा कळीचा मुद्दा होता. १९१६ च्या निवडणुकीत व्रूडो विल्सन आणि १९४० मध्ये रुझवेल्ट, दोघांनी महायुद्धात अमेरिकेचा हस्तक्षेप मर्यादित ठेवल्याची टिमकी वाजवून सत्ता राखली. पण याच मुद्दयाची दुसरी बाजू अशी की आधी आक्रमण करणारेही हेच नेते! याच अमेरिकेने १९६४ मध्ये व्हिएतनाममधील आपला हस्तक्षेप परमोच्च पातळीवर नेऊन ठेवला. निवडणूक वर्षांचा योगायोग येथेही होताच. इराकवरील हल्ला जॉर्ज बुश यांच्या कार्यकाळातील- २००३ मधील! तोदेखील निवडणुकांच्या एक वर्ष आधी. स्वत:ला आणि देशाला सर्वशक्तिमान दाखवण्यासाठी संपूर्ण जगाला प्रयोगशाळा बनविणे आणि अंगावर शेकले की मानवतावादी बुरखा पांघरणे हा अमेरिकी राजकारण्यांचा आवडता खेळ. तात्पर्य एवढेच की सत्ता ही माणसाला लाचार बनवते आणि जर तुम्ही अमेरिकेसारखे ताकदवान राष्ट्र असाल तर तुमच्या आकांक्षांना, प्रचाराला आणि धोरण निश्चितीला राष्ट्रीय सीमा वेसण घालू शकत नाहीत. महाशक्तींच्या निवडणुका शाश्वत आहेत, पवित्र आहेत आणि तिसऱ्या जगाचे स्वातंत्र्य, सार्वभौमत्व सारेच तकलादू, असा हा स्वत:च करून घेतलेला समज. अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष ही जगातील सर्वात शक्तिमान व्यक्ती. त्यात अध्यक्षीय पद्धतीमध्ये परराष्ट्र धोरण ठरवण्यासाठी तेथील संसदेची मान्यता गरजेची नाही. त्यामुळे आले पंतोजींच्या मना.. हा या परराष्ट्र धोरणाचा गाभा. मग सुरू होते स्पर्धा- स्वत:ला वरचढ दाखविण्यासाठीची. मुळातच विकसित राष्ट्र असल्यामुळे आपल्यासारखी रोटी, कपडा, मकान या मूलभूत मुद्दयांवर अमेरिकेतील प्रचाराची गाडी अडकत नाही. अर्थव्यवस्था, राष्ट्रीय सुरक्षा, स्थलांतर, परराष्ट्र धोरण आदी मुद्दयांचा कीस पाडला जातो. नुकत्याच झालेल्या एका सर्वेक्षणानुसार ४० टक्के अमेरिकी मतदारांना परराष्ट्र धोरण हा निवडणुकीत सर्वात महत्त्वाचा मुद्दा वाटतो तर दहशतवादाचा बीमोड हे प्राथमिक आव्हान! साहजिकच मतदारांना आकर्षित करण्यासाठी परराष्ट्र धोरणात अभिनव प्रयोग करणे हे नेत्यांसाठी निकडीचे होऊन बसते. याचा फायदा असा की फासे उलटे पडले तरी प्रत्यक्ष अमेरिकी भूभागावर जाणवणारी झळ त्या मानाने सौम्य असते. त्यामुळे अमेरिकेची राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक ही जगाचे भू-राजकीय आरेखन करणारी यंत्रणा झाली आहे.स्वातंत्र्यानंतर सुमारे दीड शतक अमेरिकेने परकीय हस्तक्षेपापासून अलिप्त असे परराष्ट्र धोरण अंगीकारले होते. पहिल्या महायुद्धानंतर व्यापारातून झालेली भरभराट आणि युरोप खिळखिळा होऊन निर्माण झालेली संधी यामुळे अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणांना धुमारे फुटले. १९४८ च्या निवडणुकीत विरोधी उमेदवार थॉमस डेवी हे लोकप्रिय मानले जात असताना कम्युनिस्ट बागुलबुवा उभा करून तत्कालीन राष्ट्राध्यक्ष हॅरी ट्रूमन यांनी सत्ता राखण्यात यश मिळविले. निवडणुकीच्या काही महिने आधी ट्रूमन यांनी 'मार्शल योजना' संमत करून साम्यवादाविरोधी आक्रमक धोरण आखण्यास सुरुवात केली. याच काळात जोसेफ मॅकार्थी या सिनेट सदस्याने धडाक्यात चालू केलेल्या डावेविरोधी प्रचारामुळे जनमत आधीच विभाजित झाले होते. या प्रचाराची परिणती लवकरच शीतयुद्धात झाली आणि पुढची काही दशके या प्रचाराचा भार जागतिक राजकारणाला वाहावा लागला. अमेरिकेमध्ये द्विपक्षीय निवडणूक पद्धतीमध्ये डेमोक्रॅटिक आणि रिपब्लिकन हे दोन पक्ष अस्तित्वात आहेत. व्हिएतनाम युद्धात लिंडन जॉनसन यांच्या आक्रमक व्हिएतनाम धोरणानंतर अमेरिकेच्या युद्धपिपासू वृत्तीवरील देशांतर्गत टीकेने कळस गाठला. साधारणत: परकीय धोरणांवर गुळमुळीत अथवा



संदिग्ध असणारी पक्षीय भूमिका १९६० नंतर स्पष्ट आणि परस्परविरोधी दिसू लागली. १९६० च्या निवडणुकीत डेमोक्रॅटिक पक्षाचे जॉन एफ. केनेडी निवडून आले. त्यानंतर शीतयुद्ध अधिक तीव्र झाले. क्युबा येथील फिडेल कॅस्ट्रो यांच्या डाव्या राजवटीविरोधात क्युबामध्ये सैन्य घुसविण्याची धाडसी मोहीम केनेडींनी आखली. हासुद्धा प्रचारात दिलेल्या आश्वासनांचा परिपाक! मात्र मोहीम फसली आणि आगामी काळात मूग गिळून गप्प बसण्याची नामुष्की केनेडींवर आली.रिचर्ड निक्सन यांनी सोविएत रशियाबरोबर शांततेचे धोरण आखून शस्त्रास्त्र स्पर्धा कमी करण्यावर भर दिला. पुढे १९८० मध्ये रोनाल्ड रेगन यांच्यासारखा कसलेला नेता सत्तेत आल्यानंतर त्यांनी रशियाची कुमकुवत आर्थिक बाजू हेरली आणि संघर्ष वाढविण्यावर भर दिला. २००८ च्या निवडणुकीत जॉर्ज बुश यांच्या वादग्रस्त इराक हल्ल्याविरोधी वातावरण तयार झाल्यानंतर त्याची विरोधकांद्वारे 'बुशयुद्ध' अशी हेटाळणी झाली. डेमोक्रॅटिक ओबामा सत्तेत आल्यानंतर त्यांनी आक्रमक परराष्ट्र धोरणांना मुरड घालून इराकमधून सैन्य माघारीला सुरुवात केली. बहुपक्षवादावर जोर देताना शांततापूर्ण जागतिक सहकार्याला ओबामा यांनी प्राधान्य दिले. मात्र त्याच वेळी 'आशियाला पाचर' या धोरणानुसार अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणाचे मुख्य लक्ष्य रशियाऐवजी चीनकडे वळविण्यास सुरुवात केली.त्यानंतर सत्तेत आलेल्या डोनाल्ड ट्रम्प यांच्या कोलांटयाउडया आजदेखील जागतिक राजकारणाला स्तीमित करतात. ओबामा यांनी सकारात्मक भागीदारीवर भर देताना इराणशी केलेला अणुकरार असो वा व्यापार आघाडया, ट्रम्प यांनी सत्तेत आल्यानंतर सर्वातून माघार घेण्याचा धडाका लावला. सहकार्य सोडून अमेरिकेने सर्वप्रथम या दृष्टिकोनानुसार संकुचित व्यापार धोरणांवर भर दिला. चीनशी खुलेआम आर्थिक आखाडा मांडून व्यापार युद्ध सुरू केले. युरोपशी संरक्षण सहकार्याची भूमिका सोडून नाटोच्या भविष्याबद्दल प्रश्नचिन्ह उपस्थित केले. या सर्व घटनांपेक्षा, अमेरिका- जी उदारमतवादासाठी ओळखली जात होती त्या ओळखीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. निवडणुकीतील प्रचार आणि सत्ताबदल यांमुळे एखाद्या देशाच्या धोरणात्मक प्राधान्यक्रमांत झालेला एवढा तीव्र बदल आंतरराष्ट्रीय पटलावर प्रथमच दिसून आला.नोव्हेंबरमध्ये निवडणुकांना सामोऱ्या जाणाऱ्या विद्यमान राष्ट्राध्यक्ष बायडेन यांच्यासमोर देशांतर्गत तसेच जागतिक आव्हानांचा डोंगर आहे. सत्तेवर आल्यानंतर काही महिन्यांतच अफगाणिस्तानमधून संपूर्ण सैन्य माघारीचा धाडसी निर्णय घेणारे बायडेन तालिबानच्या सरशीनंतर वादात अडकले आहेत. पुतिन यांच्या युक्रेन हल्ल्यानंतर द्विधा मन:स्थितीत अडकलेले बायडेन दोन वर्षांनंतरसुद्धा गोंधळलेले दिसतात. एकीकडे उदारमतवादी तत्त्वे आणि इतिहासाचे ओझे अमेरिकेला युक्रेनच्या बाजूने हस्तक्षेप करण्यास भाग पडत आहे तर ट्रम्प यांच्या अलिप्त वृत्तीला देशांतर्गत पाठिंबा तो हस्तक्षेप मर्यादित करत आहे. इस्त्रायल- हमास युद्धात इस्त्रायली पंतप्रधान नेत्यानाहू यांच्या आक्रमक धोरणांना वेसण घालण्यात यश येत नसल्यामुळे गाझाची दिवसेंदिवस वाताहत होत आहे, ज्याची परिणती पॅलेस्टाइनच्या वाढत्या पाठिंब्यात होत आहे. एकूणच सध्या तप्त असलेल्या तीनही आघाडयांवर बायडेन यांचा धोरण लकवा प्रकर्षाने जाणवत आहे. निवडणुकीच्या आधी प्रत्यक्ष सीमोल्लंघनाला आसुसलेले अमेरिकी राष्ट्राध्यक्ष पहिल्यांदाच जागतिक घडामोडींवर हतबल झालेले आहेत.तात्पर्य एवढेच की, परराष्ट्र धोरण आणि जागतिक घडामोडी या स्वत:च्या फायद्यासाठी वापरून घेण्याचे कसब अमेरिकी राष्ट्राध्यक्षांनी अंगीकारले आहे. जिम्मी कार्टर यांना १९७९ मध्ये तेहरान येथे अमेरिकी ओलिसांची सुटका करण्यात आलेले अपयश त्यांच्या राष्ट्राध्यक्षपदावर बेतले. तर १९८४ मध्ये निवडणुकीच्या तोंडावर रेगन यांनी लेबनॉनमधून हटविलेले अमेरिकेचे लष्करी अस्तित्व निवडणुकीत साहाय्यकारी ठरले. अमेरिकेतील निवडणूक वर्ष हे जागतिक राजकारणात अनिश्चित शक्यतांचे वर्ष ठरते. देशांतर्गत निकड आणि जागतिक परिस्थिती यांचा संगम अमेरिकी राष्ट्राध्यक्ष निवडणुकीला पुढची दिशा देण्यासाठी कारणीभूत ठरतो. परराष्ट्र धोरणातील अडथळे देशांतर्गत संघर्षांपेक्षा तुलनेने कमी असतात मात्र हीच सुलभता परराष्ट्रांवर जोरदार प्रहाराला कारणीभूत ठरते. आधुनिक काळात अमेरिकी परराष्ट्र संबंधांचे पक्षनिहाय बदलते स्वरूप तिसऱ्या जगासाठी वादग्रत परिणाम करत आहे. अशा स्थितीत नोव्हेंबर २०२४ मध्ये होणारी अमेरिकेची निवडणूक उर्वरित जगासाठीदेखील संवेदनशील ठरण्याची शक्यता आहे.

# लातूर लोकसभा मतदार संघातून असंवेदनशील उमेदवारांना मतदारांनी का निवडून द्यावे : रघुनाथ बनसोडे




लातूर : लातूर लोकसभा मतदार संघातील मतदारांनी असंवेदनशील असणाऱ्या उमेदवारांना या निवडणुकीत का निवडून द्यावे ? असा सवाल या मतदार संघातून अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक वाढविणारे रघुनाथ बनसोडे यांनी पत्रकारांशी बोलताना केला आहे. लातूर राखीव लोकसभा मतदार संघातून अपक्ष उमेदवार म्हणून पत्रकार रघुनाथ बनसोडे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यांना प्रेशर कुकर हे निवडणूक चिन्हही बहाल करण्यात आले आहे. या संदर्भात पत्रकारांशी बोलताना रघुनाथ बनसोडे म्हणाले की, उमेदवारी अर्ज दाखल केल्यावर चिन्ह वाटप झाल्यानंतर आपण दि. २४ एप्रिल रोजी शहरातील राजर्षी शाहू महाराज, अण्णाभाऊ साठेंसह महापुरुषांच्या पुतळ्यांना विनम्र अभिवादन करून आपण प्रचाराचा शुभारंभही केला होता. पण, त्याचदिवशी दुर्दैवाने आपली पुतणी रिंकू बनसोडे , ज्या बारामती विभागात मोरगाव शाखा अंतर्गत वरिष्ठ तंत्रज्ञ या पदावर महावितरण मध्ये कार्यरत होत्या, त्यांच्यावर कर्तव्यावर असताना एकाने कोयत्याने निर्घृणपणे १६ वार करून त्यांची हत्या केल्याची घटना घडली. त्यामुळे आपण व आपला परिवार दुःखाच्या गर्तेत होतो. म्हणून आपण मतदारांच्या समोर जाऊ शकलो नाही. आता आपण आपला प्रचार पुन्हा सुरु केल्याचे सांगताना बनसोडे म्हणाले की, एवढी मोठी दुर्दैवी घटना घडूनही लातूरची कन्या असणाऱ्या दिवंगत रिंकूच्या बाबतीत सहानुभूती दाखवणे, सांत्वन करणे तर सोडाच या दिवंगत कन्येला मानवतेच्या दृष्टीतून दोन शब्दाची श्रद्धांजली वाहण्याची तसदीही कोणी घेतली नसल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. आजघडीला लातूरच्या अनेक समस्या प्रलंबित आहेत. ज्यामध्ये पाणी,स्वच्छता अशा नागरी समस्यांचा प्राधान्याने उल्लेख करता येईल. याकडेही कोणताही नेता, लोकप्रतिनिधी गांभीर्याने पाहताना दिसत नाही. आपण या निवडणुकीच्या आखाड्यात सर्वसामान्यांच्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी, पत्रकार बांधवांच्या समस्या सोडविण्यासाठी उतरलो आहे. आपल्यासाठी संघर्ष नवा नाही. संघर्षातून, प्रसार माध्यमांच्या सहकार्यानेच आपली जडण घडण झाली आहे, हे आपण कायम लक्षात ठेवून चालतो. त्यामुळे आपली लातूरच्या सुजाण मतदारांना विनंती आहे की, त्यांनी उमेदवारांची पडताळणी करून योग्य उमेदवाराची आपला लोकप्रतिनिधी म्हणून निवड करावी,अशी अपेक्षाही बनसोडे यांनी व्यक्त केली.

## माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकरांच्या हस्ते स्वामी विवेकानंद विद्यालयातील स्कॉलरशीप स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



लातूर दि.०२-०५-२०२४ जेएसपीएम लातूरद्वारा संचलित स्वामी विवेकानंद विद्यालयातील इयत्ता ५ वी व ८ वी साठीच्या स्कॉलरशीप परीक्षा २०२३-२४ मध्ये विद्यालयातील ३३ विद्यार्थ्यांनी दैदिप्यमान यश मिळविले. त्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल भाजपा नेते तथा किसान मोर्चा गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांच्याहस्ते स्कॉलरशीप परीक्षेतील गुणवंतांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जेएसपीएम संस्थेचे उपाध्यक्ष अजितसिंह पाटील कव्हेकर, प्राचार्य गोविंद शिंदे उपस्थित होते. यामध्ये इयत्ता ५ वी स्कॉलरशीप परीक्षेमध्ये अथर्व कुबदे प्रथम, श्रेयस बुलबुले द्वितीय तर पल्लवी शेळके ही विद्यार्थीनी तृतीय आलेली आहे. इयत्ता ८ वी स्कॉलरशीप परीक्षेमध्ये सुमित डोणे प्रथम, रुद्राणी भांबरे द्वितीय तर आरती बारबोले ही विद्यार्थीनी तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेली आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल जेएसपीएम संस्थेच्या सचिव सौ.प्रतिभाताई शिवाजीराव पाटील कव्हेकर, जेएसपीएम संस्थेचे समन्वयक संचालक निळकंठराव पवार, कार्यकारी संचालक रंजिसिंह पाटील कव्हेकर, प्राचार्य मारुती सूर्यवंशी, मुख्याध्यापक शिवाजी सूर्यवंशी, अकॅडमीक इन्चार्ज सरदार शेख, उपमुख्याध्यापक प्रभाकर सावंत, अनिल सोमवशीं, शालेय स्पर्धा परीक्षा विभाग प्रमुख संगादेव आवस्कर, सोनाली कदम, संगिता जगताप, अल्का अंकुशे, श्रीकांत भिसे, आशा वाकडे, विद्या गायकवाड, बालाजी बोकडे, शितल वाडीकर, राधा कवरे, विनोद सूर्यवंशी, प्रशांत कांबळे, रमाकांत शिंदे, सुरज सोनटक्के, भगवंत कलेधेले, अफसर शेख आदींनी कौतुक केले.

# राजमाता जिजामाता संकुलात महाराष्ट्रदिन उत्साहात साजरा




लातूर, दि. २- येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलातील राजमाता जिजामाता विद्यालय, तुळजाभवानी विद्यालय व संगमेश्वर विद्यालयात महाराष्ट्रदिन उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्त संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते ध्वजारोहण करून महाराष्ट्र निर्मिती लढ्यातील हुतात्म्यांना अभिवादन करण्यात आले.यावेळी संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, संस्थेच्या विधी सल्लागार राणी केंद्रे, प्रा. कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, अश्विनी केंद्रे, समन्वयक वैशाली केंद्रे, प्राचार्य गणपत मुंडे, राजेंद्र जायेभाये, राजीव मुंढे, शिवकांत वाडीकर, विष्णू कराड, परमेश्वर गित्ते उपस्थित होते.यावेळी बोलताना प्राचार्य डी. एन. केंद्रे म्हणाले, महाराष्ट्र हे शूर-वीरांचे राज्य आहे. महाराष्ट्र हे पुरोगामी विचारांचा वारसा असलेले राज्य आहे. महाराष्ट्रात अनेक समाजसुधारक होऊन गेले. आपल्या महाराष्ट्र राज्याला सांस्कृतिक वारसा लाभला आहे. महाराष्ट्राला छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले असे अनेक युगपुरुष लाभलेले आहेत. महाराष्ट्राला अनेक संत-महापुरुष लाभले आहेत, हे आपले भाग्य आहे. महाराष्ट्राने शिक्षण, क्रीडा, सांस्कृतिक, चित्रपट, संगीत, विज्ञान, तंत्रज्ञान आदि क्षेत्रात उत्कृष्ट भरारी घेतली आहे. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीसाठी अनेकांनी बलिदान दिले आहे, त्यांचे स्मरण करून सर्वांनी त्यांना अभिवादन केले पाहिजे, असे सांगून विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राचे नाव आणखी उज्वल करावे, असे आवाहन प्राचार्य केंद्रे यांनी केले. सूत्रसंचालन राजीव मुंढे यांनी केले. यावेळी संकुलातील प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# 'संगमेश्वर'च्या विद्यार्थ्यांचे परीक्षेत घवघवीत यश






लातूर, दि. २- पुण्याच्या महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्यावतीने इयत्ता ५ वीच्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्तीच्या परीक्षेत येथील संगमेश्वर प्राथमिक विद्यामंदिरच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळविले असून या शाळेचे १४ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत. यासाठी शिक्षण उपसंचालक डॉ. गणपत मोरे यांनी संस्थाचालकांना प्रोत्साहन दिले होते.या परीक्षेत संगमेश्वर विद्यामंदिरच्या श्रेया गोविंद शिराळकर या विद्यार्थिनीने २२६ गुण, रुद्राक्ष बब्रुवान लांडगे २१८, गौरवी सुखाचार्य पाटील २१४, प्रेम चंद्रकांत लोखंडे २१४, साक्षी संदीप गरड २०८, प्रथमेश मनोज शिरसाट १९८, सचिन अनिल कांबळे १९८, पल्लवी व्यंकटराव तांदळे १९६, नमिता संजय गालफाडे १९६, साई राहुल शिंदे १९४, असद जलील शेख १९०, अर्णव यशवंत पवार १८४, करण गोविंद फड १६४ व सोहम मनोहर शिंदे याने १५६ गुण मिळविले आहेत. या विद्यार्थ्यांना ए. व्ही. पवार, ए. व्ही. माने, एन. आर. मुंडे, जे. जी. कावळे, डी. एस. भदभदे, जी. बी. मोरे, आर. व्ही. डुकरे व डी. पी. दिवटे या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.या यशाबद्दल शिक्षण उपसंचालक डॉ. गणपत मोरे, शिक्षणाधिकारी नागेश मापारी, शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, गटशिक्षणाधिकारी निवृत्ती जाधव, संस्थाध्यक्षा के. ए. जायेभाये, सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे, उपाध्यक्ष प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, कोषाध्यक्षा कविता केंद्रे, सहसचिव राजेंद्र जायेभाये, स्वाती केंद्रे, अश्विनी केंद्रे, वैशाली केंद्रे यांनी कौतुक केले.

# लोकसभेच्या निवडणुकीत गोर-सेनेची तटस्थ भूमिका नोटाला मतदान करण्याचे आवाहन!




लातूर - भारतासह महाराष्ट्रामध्ये बंजारा समाजाची सर्वात मोठी अग्रगण्य सामाजिक संघटना म्हणून गोर-सेनेचा प्रामुख्याने उल्लेख केला जातो.बंजारा समाजावरील अन्याय अत्याचार,न्यायासाठी लढणारी लढवय्यी संघटना म्हणून भारतभर गोर-सेनेची प्रामुख्याने ओळख आहे.भारतासह महाराष्ट्रातील प्रत्येक वाडी,वस्ती तांड्यामध्ये गोर सेनेची शाखा तिथं कार्यकर्ता अशी ख्याती आहे.समाजातील चाली,रीती परंपरा यासाठी अहोरात्र काम करणारी एकमेव संघटना म्हणून सर्वपरिचित आहे. भारताच्या स्वातंत्र्याच्या ७६ वर्षानंतरही कोणत्याचं वाडी-वस्तीत तांड्यावर पाहिजे तितक्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या नाहीत,त्यामुळे संपूर्ण बंजारा समाजामध्ये राजकीय पक्षाविषयी तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.सध्या सुरू असलेल्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गोर-सेनेची भूमिका ही तटस्थ असून कोणत्याचं राजकीय पक्षाला या संघटनेने आपला पाठिंबा दर्शविला नसल्याने संबंध महाराष्ट्रामधील गोर-सैनिक कार्यकर्त्यांनी तटस्थ राहुन नोटाला मतदान करून लोकशाही टिकविण्याचे आवाहन गोर-सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा.संदेशभाऊ चव्हाण यांच्या आदेशानुसार जिल्हाध्यक्ष ॲड.संतोष पवार,प्रसिद्धीप्रमुख शरद राठोड यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे जाहीर केले आहे. संबंध महाराष्ट्रामध्ये जवळपास दीड कोटी बंजारा समाजाची लोकसंख्या आहे,तसेच पूर्ण महाराष्ट्र मधून एकही बंजारा समाजाला कोणत्याही राजकीय पक्षाने लोकसभेचे तिकीट दिले नसल्याच्या कारणावरून संबंध महाराष्ट्रामध्ये बंजारा समाजाचा राजकीय पक्षाविषयी तीव्र असंतोष व्यक्त केला जात आहे.त्याच पार्श्वभूमीवर मराठवाड्यात ही होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीत मराठवाड्यात (जवळपास दहा लाख बंजारा मतदार) असताना ही त्यांना डावलले जातं असल्याने (उदा-लातूर,बीड उस्मानाबाद,नांदेड) येथील गोर सैनिकानी कोणत्याचं राजकीय पक्षांला प्रचार,पाठिंबा दिला नसल्याने संपूर्ण कार्यकर्त्यांनी तटस्थ राहून नोटाला मत देऊन लोकशाही टिकविण्याचे आवाहन गोर सेनेचे अध्यक्ष प्रा.संदेशभाऊ चव्हाण यांच्या आदेशानुसार लातूर जिल्हाध्यक्ष ॲड.संतोष पवार,प्रसिद्धीप्रमुख शरद राठोड यांच्या वतीने करण्यात आलेले आहे. जोपर्यंत राष्ट्रीय अध्यक्ष प्रा.चव्हाण यांचा पुढील आदेश येई नाही,तोपर्यंत गोर सैनिकांची भूमिका तटस्थ राहील.

# आम्ही सत्तेत आल्यास जातनिहाय जनगणना करणार भाजप जातनिहाय जनगणना मुद्द्यापासून पळ काढत आहे

लातुर प्रतिनिधी : दि. २ मे २०२४ लोकसभा निवडणुकीत देशात इंडीया (महाविकास) आघाडी जिंकल्यास आणि आम्ही सत्तेत आल्यास जातनिहाय जनगणना करणार आहोत. ही जातनीहाय जनगणना या देशातील प्रत्येक नागरीकाला त्याचा हक्क मिळाला पाहिजे यासाठी राहुलजी गांधी यांचा करण्याचा मुख्य उद्देश आहे. ही जातनिहाय जनगणना आज पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपच्या अंगलट आली आहे. यामुळे त्यांनी राजस्थान, मंगळसूत्र असे विषय समोर करून जातनिहाय जनगणना मुद्द्यापासून पळ काढत आहे असे काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटले आहे. लातुर लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडी काँग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या प्रचारार्थ काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवार दि. १ मे रोजी सायंकाळी चाकूर या ठिकाणी जाहीर प्रचार सभा पार पडली. या जाहीर सभेस सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख, राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्यासह डॉ. शिवाजी काळगे यांची प्रमुख उपस्थिती होती यावेळी ते बोलत होते. यावेळी बोलताना प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, लातुर लोकसभा मतदार संघाने आजपर्यंत चांगले नेतृत्व संसदेत दिले आहे. ही परंपरा टीकवण्यासाठी या निवडणुकीत डॉ. शिवाजी काळगे यांना महाविकास आघाडीने उमेदवारी दिली आहे. लोकशाही म्हटल्यास लोकांनी लोकासाठी चालवलेले सरकार, पण विद्यमान सरकारला याचा विसर पडला आहे. या विरोधात भारत जोडो न्याय यात्रेतून आमचे नेते राहुलजी गांधी यांनी सर्व घटकांना सद्याच्या दहशतवादी सरकार पासून भयमुक्त करण्याचे काम केले. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडी जिंकल्यास जातनिहाय जनगणना आम्ही सत्तेत आल्यास करणार असून ती जातनिहाय जनगणना आज पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपच्या अंगलट आली आहे. या देशातील प्रत्येक नागरीकाला त्याचा हक्क मिळाला पाहिजे, हा राहुलजी गांधी यांचा मुख्य उद्देश आहे. पण यांनी राजस्थान, मंगळसूत्र असे विषय समोर करून जातनिहाय जनगणना मुद्द्यापासून पळ काढत आहे असे सद्या दिसून येत आहे. आपल्या शेतकऱ्यांनी पिकवलेला कांदा, सोयाबीन कवडीमोल घेऊन जादा भावाने परदेशातून आयात करणे असा उद्योग सद्या सुरू आहे. ज्या लातुर मधून सर्वाधिक डॉक्टर, इंजिनिअर घडविले जातात, ज्या लातुर मध्ये बाहेर जिल्ह्यातील विद्यार्थी शिक्षण घेतात त्या शैक्षणिक लातुर पॅटर्नला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभेत लातुर पॅटर्न भंगार पॅटर्न आहे, असे मुख्यमंत्री आणि पंतप्रधान म्हणतात त्यांना या लोकसभा निवडणुकीत त्यांची जागा दाखवावी आणि भंगार म्हणणाऱ्यांना भंगार करावे व डॉ शिवाजी काळगे यांना प्रचंड मतांनी निवडून देत लातुर पॅटर्न काय आहे हे विरोधकांना दाखवावे, असे आवाहन त्यांनी उपस्थित जनसमुदायाला केल. भरघोस मतदान करून उज्वल भविष्यासाठी डॉ. शिवाजी काळगे यांना निवडून द्यावे सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यावेळी बोलताना सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख म्हणाले की, ही लोकसभेची निवडणूक असून आजवर बऱ्याच पंतप्रधानानी देश चालविला पण गेल्या १० वर्षात जे पंतप्रधान आहेत असे घमेंडी, केवळ अश्वासने देणारे पण पूर्ण न करणारे पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी आपल्याला मिळाले ज्यांनी कल्याणकारी सरकार कधी चालविले नाही, फोडाफोडीचे राजकारण केले, दोन मुख्यमंत्र्यांना जेलमध्ये त्यांनी टाकले असे पंतप्रधान आणि सरकार आज देशात असून हे सरकार पुन्हा सत्तेत येणार नाही याची काळजी आपण भरघोस मतदान करून आपल्या उज्वल भविष्यासाठी डॉ. शिवाजी काळगे यांना निवडून द्यावे असे आवाहन त्यांनी केले. आदरणीय शिवराज पाटील साहेब आमचे नेते आणि चाकूरचे भूमिपुत्र त्यांची मान आणि शान उंचावणे आमचे कर्तव्य माजी मंत्री आमदर अमित विलासराव देशमुख यावेळी बोलताना माजी मंत्री आमदर अमित विलासराव देशमुख म्हणाले की, कोई लौटा दे मुझे बिते हुये दिन नही चाहीये मुझे अच्छे दिन अशी सुरुवात करीत महायुती विरुद्ध महाविकास आघाडी लढ्याला आपण दिलेला प्रतिसादाचे कौतुक करावे तितके कमी आहे असे ते म्हणाले. आदरणीय शिवराज पाटील साहेब आमचे नेते आणि चाकूरचे भूमिपुत्र असून त्यांनी मान आणि शान उंचावणे हे आमचे कर्तव्य आहे. त्यांच्या विचारांशी एकनिष्ठ असा जनसमुदाय आज या ठिकाणी एवढ्या मोठ्या संख्येने उपस्थित आहेत याचे आम्हाला समाधान आहे. डॉ शिवाजी काळगे यांना सामान्य माणसाने उचलून धरले असून त्यांना प्रत्येक ठिकाणी उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळत आहे आणि हे पाहता लातुरचा मतदार त्यांना लोकसभेत पाठविल्याशिवाय शांत बसणार नाही. लोकसभा निवडणुकीची ही लढाई आपल्याला सर्वांना मिळून लढायची असून डॉ. शिवाजी काळगे यांचे ईव्हीएम मशीन वर क्रमांक २ वर नाव असून त्यांना प्रचंड मतांनी विजयी करावे, असे आवाहन करीत चाकूर मधील लक्ष्मी नगर मधील सभागृह, क्रीडा संकुलसाठी निधी आणि शादी खाण्यासाठी आवश्यक निधी दिला असा शब्द त्यांनी यावेळी दिला. दिशाभुल करणाऱ्या भाजप सरकारला पायउतार करण्यासाठी पुढाकार घ्यावा माजी मंत्री विनायकराव पाटील माजी मंत्री विनायकराव पाटील म्हणाले की, आपल्या सर्वांना या सरकारने अनेक अश्वासने देऊन गेली १० वर्षे केवळ थापा मारल्या आणि एकही आश्वासन पूर्ण केले नाही. या लोकसभा निवडणुकीत अनेक पक्ष, गट तट, महिला, नागरिक, युवक सर्वजण एकत्र येऊन आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना हटविण्यासाठी कामाला लागले आहेत. आपण देखील आशा भूलथापा देऊन केवळ दिशाभुल करणाऱ्या भाजप सरकारला पाय उतार करण्यासाठी पुढाकार घ्यावा व यावेळी यांच्या आश्वासनाला या निवडणुकीत बळी पडू नये असे म्हणत आजवर झालेली चूक यावेळी होणार नाही आणि किमान ५० हजार मतांची लीड देऊ असा शब्द दिला. देशातील भाजपचा सुपडा साफ होणार यावेळी बोलताना वजाहत मिरझा म्हणाले की, आज देशातील भाजपचा सुपडा साफ होणार असून सर्वत्र या सरकार बद्दल तीव्र रोष आहे. आणि आता केवळ काँग्रेस पक्षच आपणास यापुढे दिसणार असून आपण ही आता या सरकारला त्यांची जागा दाखवावी आणि डॉ शिवाजी काळगे यांना विजयी करावे अशी विनंती केली. देवेंद्र फडणवीस यांनी आरक्षण मुद्द्यावर मराठा, धनगर समजला झुलवत ठेवले यावेळी बोलताना यशपाल भिंगे म्हणाले की, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दृष्टी दोष झाला असून यासाठी मविआने लातुर लोकसभा मतदार संघातील उमेदवार म्हणून नेत्र रोग तद्द डॉ शिवाजी काळगे याना उमेदवारी दिली असून आज बरेच जण भाजप मध्ये जात आहेत आणि त्यांच्या जाण्यामुळे काँग्रेस पक्षाचे मतदार कमी होण्याऐवजी उलट वाढत आहे हे आवर्जून सांगावे लागेल. देवेंद्र फडणवीस यांनी माणसात माणूस ठेवला नाही आरक्षण मुद्द्यावर मराठा, धनगर समजला झुलवत ठेवले असून याना यांची जागा दाखविण्याची ही वेळ आहे. भाजप म्हणजे भाड्याने जमवलेली पार्टी असून आपण आज कोणाच्या बाजूने आहात हे पाहण्याची ही लोकसभा निवडणूक असून आपला ओरिजिनल डीएनए हा काँग्रेस पक्षाचा आहे हे दाखविण्याची ही वेळ असून आपण मोठ्या संख्येने आपले उमेदवार डॉ शिवाजी काळगे यांना प्रचंड मतांनी निवडून द्यावे असे आवाहन उपस्थित सर्वांना त्यांनी केले. यावेळी बोलताना एन.आर.देशमुख म्हणाले की, आम्ही गेली २५ वर्ष आदरणीय नेते सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब यांच्या नेतृत्वाखाली काम केले. सर्व सामान्य माणूसाचा विचार सतत केला आणि यापुढे देखील हे काम आम्ही करीत राहू असा शब्द दिला. यावेळी बोलताना माधवराव कोळे म्हणाले की, चाकूर तालुक्यात काम करत असताना तालुक्यातील जवळपास ८५ गावात फिरलो व सर्व सामान्य माणसाला न्याय देण्याचा प्रयत्न केला यापुढे देखील काँग्रेस पक्षाचे काम करताना तण मनाने काम करेन आणि हे करताना आपण सर्वांनी एकत्रित येऊन या निवडणुकीत आपले शैक्षणिक धोरण, कायमस्वरूपी पाणी,रोजगार निर्मिती, चाकूर सह लातुर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठीची ही लोकसभा निवडणूक असून या निवडणुकीत गेल्या कार्यकाळात विद्यमान सरकार आणि आपल्या निवडून दिलेल्या खासदारांनी काय केले हे विचारावे लागेल. या सरकारने धनगर समाजाला वेगवेगळ्या प्रकारची अनेक अश्वासने प्रत्येक निवडणुकीत दिली व मतदारांना भावनिक करून मते घेतली आणि नंतर आपल्याकडे फिरकून पाहिले नाही हा अनुभव लक्षात घेता या निवडणुकीत आपण ठाम भूमिका घेऊन कुठल्याही भूल थापाणा बळी पडू नये असे आवाहन केले. यावेळी बोलताना डॉ. शिवाजी काळगे म्हणाले की, आज मी आपल्या समोर मविआ चालातुर लोकसभा मतदार संघातील उमेदवार म्हणून निवडणुकीत उभा असून आपण गेल्या १० वर्षात विद्यमान सरकारच्या चुकीच्या धोरणाचा बळी ठरलो असून महागाई कमी झाली नाही,सुशिक्षित बेरोजगार नौकरी साठी धडपड करीत आहे पण नौकरी नाही, महिला खेळाडूंना आपल्या वर झालेल्या अन्याया मुळे मेडल परत करण्याची वेळ आली यासाठी आज आपल्याला या सरकार विरोधात लढा उभारण्याची गरज आहे. गेल्या सव्वा महिन्यात प्रचार करताना असा एकही माणूस भेटला नाही की ज्याचे काम विद्यमान खासदाराने केले आणि यासाठी आपले प्रश्न सोडवण्यासाठी आपली ताकद मताच्या रुपात माझ्या पाठीशी उभे करावे आणि मविआ ला बहुमताने विजयी करावे अशी विनंती केली. यावेळी बोलताना विलास पाटील चाकूरकर म्हणाले की, सद्या सुरू असलेली लोकसभा निवडणूक ही आपल्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. आज सर्व घटक त्रस्त असून सर्वसामान्य माणूस महागाई ने वैतागला आहे.शेतकर्याच्या शेतमालाला भाव नाही, सुशिक्षित बेरोजगार युवकाना रोजगार नाही,सोयाबीनला भाव नाही,जेवढा खर्च पिकविण्यासाठी होतो तेवढा देखील निघत नाही,खते व बियांचे भाव वाढले आहेत त्यात जीएसटी ची मार या सरकारला घेणेदेणे नाही या सरकारचे दोनच अपत्य आहेत ते म्हणजे अडाणी आणि अंबानी यामुळे आपण विचार करावा आणि विज्ञान विरुद्ध अज्ञान यामध्ये आपण सर्वांनी विज्ञानाच्या मागे राहावे व आपले उमेदवार डॉ शिवाजी काळगे याना विजयी करावे अशी विनंती त्यांनी केली. दरम्यान लातुर लोकसभा मतदार संघातील मविआचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांना प्रचंड आशा मताधिकक्याने विजयी करण्याचा निर्धार या जाहीर सभेस उपस्थित असलेल्या सर्वांनी व्यक्त केला. यावेळी बालाजी रेड्डी, श्रीशैल उटगे, शिवाजी बेंद्रे, वजाहत मिर्जा, संजय शेटे, विक्रांत गोजमगुंडे, अण्णासाहेब पाटील, एन.आर.पाटील, ॲड. कोळगावे, मकबूल वलांडीकर, हरिभाऊ गायकवाड, ज्योती ताई पवार, नेहा मोरे, सौ.चांदसुरे ताई, यांच्यासह मविआ घटक पक्षाचे पदाधिकारी, चाकूर सह परिसरातील नागरिक, महिला भगिनी, युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अजिंठा लेणी परिसरात पाली भाषा विद्यापीठाची लवकरच निर्मिती होणार डॉ. उपगुप्त महाथेरो



लातूर :- कुठल्याही भाषेला धर्म नसतो. भाषा ही धर्म विरहित असते परंतु आपण भाषेची जोड धर्मासोबत लावलेली आहे. बनारस येथे संस्कृत भाषेचे विद्यापीठ, अलिगड येथे उर्दू भाषेचे विद्यापीठ आणि हिंदी भाषेचे विद्यापीठ वर्धा येथे आहे. मात्र पाली भाषा ही ज्ञान भाषा असून सुद्धा पाली भाषेचे विद्यापीठ कुठेही नाही त्यामुळे पाली भाषेच्या प्रचार आणि प्रसारासाठी अजिंठा लेण्याच्या पायथ्याशी असलेल्या संस्थेच्या ७५ एकर जमिनीवर पाली भाषा विद्यापीठाची लवकरच निर्मिती केली जाईल याला शासनाची मान्यता सुद्धा लवकरच मिळेल असे प्रतिपादन अखिल भारतीय भिक्खू संघ आणि बौद्ध धम्म संस्कार प्रशिक्षण चॅरीटेबल ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. उपगुप्त महाथेरो यांनी केले. महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात महाराष्ट्र आणि कामगार दिनानिमित्त त्यांना प्राचार्य कक्षामध्ये श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे संचालक ॲड. श्रीकांतप्पा उटगे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी भंते बुध्दशील, प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, केशव कांबळे, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे आणि डॉ. टि. घनश्याम यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. उपगुप्त महाथेरो म्हणाले की, पाली भाषा ही आराधनेची भाषा नसून ती ज्ञान भाषा आहे. तिच्या प्रत्येक शब्दामध्ये ज्ञान आहे. भाषा ही कुठल्याही धर्माची नसते तर ती मानवी व्यवहाराच्या देवाण-घेवांनीसाठी असते. भाषा ही ज्ञान संपादन करण्यासाठी असते आणि तिची एक वेगळी गरिमा असते. जपान, थायलंड, कोरिया या देशांमध्ये प्रत्येक व्यक्ती ह्या कामामध्ये व्यस्त असतात. विशेषत: महिलांची संख्या या देशांमध्ये अधिक असून त्या उद्योगात कार्य करतात. देशांमध्ये समृद्ध शेती, संपन्न आरोग्य, मुबलक पाणी उपलब्ध असून भ्रष्टाचाराला थारा नाही त्यामुळे मानवी जीवन सुखी आणि समृद्ध आहे. देशांमध्ये संघर्ष, भांडणे, परस्पर मतभेद आणि वादविवाद ह्या गोष्टी दिसून येत नाही. प्रत्येकामध्ये विनम्रता आणि समाधान असल्यामुळे प्रत्येक व्यक्ती हा प्रसन्न राहतो असे सांगून महाराष्ट्र आणि कामगार दिनानिमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमांमध्ये संस्थेचे संचालक ॲड. श्रीकांतप्पा उटगे यांनी डॉ. उपगुप्त महाथेरो यांचे स्वागत करून त्यांना पाली विद्यापीठाच्या निर्मितीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे यांनी केले तर आभार प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी मानले.

# सात गावांत मोबाइल नेटवर्क नाही; डिजिटल इंडियाचे स्वप्न धुसर निवडणूक आयोगाने या गावांना 'शाडो मतदान केंद्र' दिले नाव

संपर्कच होत नाही...
:गावात कोणतेही नेटवर्क नाही ही मागणीही त्यांच्या निवेदनात होती. जिथे डिजिटल इंडियाचे स्वप्न रंगवले जात आहे. पण आजही किनवट या आदिवासी तालुक्यातील अनेक गावांत मोबाइलचे नेटवर्क नसल्याने संपर्क साधण्याचा प्रयत्न करूनही संपर्क होत नाही.




किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) : तालुक्यात खासगी मोबाइल कंपन्यांचे जाळे सर्वत्र पसरवले आहे. बीएसएनएलची सेवा तर चक्क कोलमडली आहे. आजही किनवट तालुक्यातील अनेक गावांत खासगी मोबाइल कंपन्यांचे नेटवर्क येत नसल्याने तशा गावांना निवडणूक आयोगाने शाडो मतदान केंद्र 'असे नाव दिले होते. या शाडो मध्ये तालुक्यातील सात गावे असल्याचे उघड झाले आहे. अँड्रॉईड मोबाइलच्या जमान्यात येथे नेटवर्क येत नसल्याने डिजिटल इंडियाचे स्वप्न धूसर होऊ पाहत असल्याचे बोलले जात आहे. तर या भागात हे स्वप्न साकारले नसल्याचे चित्र दिसत आहे. बीएसएनएलची सेवा ग्रामीण भागात तशी पाहिली तर कुचकामी झाली. स्पर्धेच्या युगात खासगी कंपन्यांचे नेटवर्क जिकडे तिकडे आहे. असे असतानाही किनवट या आदिवासी दुर्गम भागात अनेक गावांत मोबाइल नेटवर्क येत नसल्याने आजही ती गावे संपर्काबाहेर आहेत. अनेकांनी बीएसएनएलचे नंबर पोर्ट करून खासगी कंपन्यांचे मोबाइल सीमकार्ड घेऊन संपर्क करणे पसंद केले. बीएसएनएलच्या मोबाइलची वाताहत झाली आहे. बीएसएनएल जणू स्पर्धेच्या युगातून बाहेर पडले आहे, असे सध्या चित्र किनवट या डोंगराळ आदिवासी भागात पाहावयास मिळत आहे. अशा गावांत लहानमोठ्यांना मोबाइल हाताळण्यासाठी आणखी किती दिवस प्रतीक्षा करावी लागणार? असा प्रश्न विचारला जात आहे. गावकऱ्यांनी टाकला मतदानावर बहिष्कार, :किनवट या डोंगराळ भागात सिंगारवाडी, पिपरफोडी, सुंगागुडा, इंजेगाव, पांगर- पहाड, आंदबोरी (ई) व झळकवाडी या सात गावांत मोबाइलचे नेटवर्क येत नसल्याने निवडणूक विभागाने ही सात मतदान केंद्रे शाडो मतदान केंद्रे म्हणून घोषित केली होती. मतदान केंद्राध्यक्षाला मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावरील दर दोन तासांची टक्केवारी नियंत्रण कक्षाला देण्यासाठी काही पर्यायी व्यवस्था करता येईल का? याची चाचपणी केली होती. यामधील पांगरपहाडच्या गावकऱ्यांनी तर लोकसभेच्या मतदानावर बहिष्कार टाकला होता

# १० दिवसीय श्रामनेर शिबिर




पैठण :- माणसाला माणूस बनण्याकरिता संस्कारांची आवश्यकता आहे . संस्कारावीना माणूस बिघडतो व सुसंस्काराने माणूस घडतो . प्रत्येक मानव प्राणी सुसंस्कारीत व्हावा यासाठी बुद्धाचा धम्म आहे . पण ब-याचदा आपण धम्म ऐकतो पण ऐकून त्याचे चिंतन मनन करीत नाही , स्वतःच्या जीवनात ते विचार उतरवत नाही , म्हणून योग्य काय आणि अयोग्य काय , कुशल काय आणि अकुशल काय यातील भेदच आपल्याला समजत नाही .रोज मेणबत्ती अगरबत्ती लावल्याने बुद्ध प्रसन्न होतील आणि माझ्या मनात असलेल्या सुप्त इच्छा पूर्ण होतील . या भ्रमात राहने म्हणजेच अज्ञान होय . घरात बुद्ध व बाबासाहेबांचे अनेकानेक फोटो किंवा मुर्त्या आहेत , घरावर धम्म ध्वज लावलेला आहे , दाराला अशोक चक्र लावलेले आहे , किंवा गळ्यात बुद्धाचे लॉकेट घातलेले आहे . ही सर्व बौद्ध असण्याची ओळख नसुन यामुळे कुठलाही व्यक्ती बौद्ध ठरत नाही . तर आपले कृती, आचरणच आपली बौद्ध असल्याची खरी ओळख आहे म्हणून आदर्श,निर्भय, नीतिमान ,व्यक्ती बनविण्यासाठी सुंदर जीवन जगण्यासाठी कमीत कमी १० दिवस तरी श्रामनेर दिक्षा घेऊन बुद्धपुत्र म्हणून जगण्याची संधी बुद्ध जयंती(वैशाख पौर्णिमा)निमित्त उपलब्ध होत आहे पूज्य भिक्खू संघ यांच्या मागदर्शन खाली १०, दिवसीय श्रामनेर धम्म संस्कार शिबिराचे आयोजन केले आहे धम्म संस्कार श्रामनेर शिबिर १४ मे २०२४पासून सूरवात होत आहे प्रतेक बौद्ध घरातील व्यक्तीने, युवकांने ह्या शिबिर मध्ये दिक्षा घेऊन आदर्श नीतिमान निर्भय जीवन जगण्यासाठी प्रयत्न करावा. १० दिवस शिबिर मध्ये बौद्ध सम्राट,राजे यांच्या चरित्र कार्याची तसेच डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक, शैक्षणिक ,धार्मिक, राजकीय ,आर्थिक, संविधान कार्याची माहिती आणि बुद्ध धम्म संघ बद्दल प्रशिक्षण देण्यात येईल .. पैठण शेवगाव तालुक्यातील तसेच ज्यांना शक्य होईल अश्या व्यक्तींनी १० दिवस निवासी शिबिर मध्ये दिक्षा घेण्यासाठी दिनांक १३मे २०२४रोजी जेतवन धम्म संस्कार केंद्र तेलवाडी ता पैठण जी छत्रपती संभाजी नगर तेथे उपस्थित राहावे..

# नवोदित गझलकारांच्या गझलसंग्रहाचे प्रकाशन सोहळा संपन्न

ठाणे :- ठाणे मराठी ग्रंथ संग्रहालयात ललित कला फाउंडेशनने आयोजित नवोदित गझलकारांचा पालवी या प्रतिनिधिक गझलसंग्रहाचा प्रकाशन सोहळा पार पडला प्रकाशन सोहळ्यानंतर पालवी गझलसंग्रहात समाविष्ट गजलकारांनी आपल्या गझल सादर केल्या सदर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून रोहिदास पोटे (समीक्षक व गझलकार) डॉ लक्ष्मण शिवणेकर (शिक्षण तज्ञ व गझलकार) डॉ सुभाष कटकदौड (गझलकार) तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉ सौ वंदना महाजन (मराठी विभागप्रमुख मुंबई विद्यापीठ) या प्रमुख पाहुण्यांनी सर्व गझलकाराचे कौतुक करून आपल्या गजला सादर केल्या

तसेच सदर कार्यक्रमप्रसंगी रोहिदास पोटी सरांनी नुकताच राज्य शासनाच्या डॉ बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ कवी-साहित्यिक व विचारवंत उत्तम दासु तरकसे यांचा परिचय करून देत त्यांना मनोगत व्यक्त करण्याचा आग्रह केल्याने त्यांनी आपल्या मनोगतात ललित कला फाउंडेशनच्या सहकार्याने त्यांचा नुकताच प्रकाशित झालेला शाईची नोंद या काव्यसंग्रहास जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळाचा पद्मश्री दया पवार साहित्य पुरस्कार मिळाल्याचे जाहीर करत त्याच संग्रहातील कविता सादर केल्या

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉक्टर अंजना भंडारी यांनी उत्तम प्रकारे केले तसेच श्री योगेश दिवटे यांनी उपस्थित प्रेक्षकांचे व




प्रमुख पाहुण्यांचे तसेच ललित कला फाउंडेशनच्या सर्व कार्यकारी पदाधिकारी व सदस्यांचे आभार मानले खास करून पालवी नवोदित गझलकारांचा संग्रह काढण्याची कल्पना दिलीप कारखानीस सरांची होती त्याकरिता त्यांनी खूप मेहनत घेतल्याने कार्यक्रम बहारदार झाला

# अहमदपूर कॉंग्रेस पदाधिकार्यांचा भाजपात प्रवेश



अहमदपूर/प्रतिनिधी : देशातील जनतेचे हित जोपासून जगात देशाचा नावलौकिक करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यपद्धतीवर विश्वास ठेऊन अहमदपूर तालुक्यातील कॉंगेसच्या अनेक पदाधिकार्यांनी भाजपामध्ये प्रवेश करून लातूर लोकसभेचे भाजपा महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करण्याचे अभिवचन दिले.यावेळी कॉंग्रेस पक्षाचे तालुका उपाध्यक्ष दयानंद वाघमारे, शहर समन्वयक प्रफुल्ल ढवळे, ॲड. अमोल इरले यांच्यासह कॉंगेसच्या अनेक पदाधिकार्यांनी भाजपात प्रवेश केला.भाजपाचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, प्रदेश प्रवक्ते तथा विधानसभा प्रमुख गणेश हाके पाटील, जिल्हा सरचिटणीस ॲड. भारत चामे यांच्या उपस्थितीत प्रवेश संपन्न झाला.कॉंगेसने लातूर लोकसभा निवडणुकीत मुळ प्रवर्गातील उमेदवारास बाजूला सारून असंवैधानिक तसेच घटनेचा अवमान करून उच्च वर्णीय उमेदवार दिला असल्याने मुळ अनुसूचित जातीचा अपमान केला असल्याची भावना वाढत आहे. त्यामुळे या निवडणुकीत कॉंग्रेसच्या उमेदवाराचा पराभव केल्या शिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही, अशीही भावना पक्ष प्रवेश सोहळ्यानंतर पदाधिकार्यांनी व्यक्त केली.यावेळी भाजपा जिल्हा उपाध्यक्ष गोविंद गिरी, तालुकाध्यक्ष प्रताप पाटील, शहराध्यक्ष सुशांत गुनाले, माजी पं. स. सदस्य माणिक नरवटे, धैर्यशील देशमुख यांच्यासह भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# अत्याधुनिक तंत्रज्ञान अवगत करून विद्यार्थ्यांनी यशस्वी व्हावे : डॉ. पाटील

लातूर, दि. २ - जग तंत्रज्ञानावर चालणारे आहे, तंत्रज्ञानाशिवाय जगाला पर्याय नाही. यामुळे प्रत्येकाने आयटी क्षेत्रातील अत्याधुनिक मशीन लर्निंग, डेटा सायन्स व आर्टीफिशिअल इंटेलिजेंट या तीन कृत्रीम बुध्दिमत्ता प्रत्येकाने चांगल्या प्रकारे आत्मसात कराव्यात, यात मोठ्या प्रमाणावर नोकरीच्या संधी उपलब्ध होणार आहेत, असे प्रतिपादन डॉ. एम. आर. पाटील यांनी येथे केले. येथील कॉक्सिट महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी १५ दिवसांच्या मशीन लर्निंग या विषयावरील कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. याचे उद्घाटन रॉयल एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक डॉ. एम. आर. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून कॉक्सिटचे प्राचार्य डॉ. एन. एस. झुल्पे, उपप्राचार्य डॉ. व्ही. व्ही. भोसले, उपप्राचार्य डॉ. डी. आर. सोमवंशी, तज्ज्ञ संचालक एन. डी. जगताप, ट्रेनिंग व प्लेसमेंट प्रमुख प्रा. कैलास जाधव उपस्थित होते. डॉ. एम. आर. पाटील म्हणाले, सध्या आयटी क्षेत्रात कृत्रीम बुध्दिमत्तेलाा जास्त महत्व आहे. प्रत्येक व्यवहारात कृत्रीम बुध्दिमत्तेचा मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे. मशीन लर्निंग, डेटा सायन्स व आर्टीफिशिअल इंटेलिजेंट या तीन कृत्रीम बुध्दिमत्ता अत्याधुनिक आहेत. यांचाच वापर सर्रासपणे होत आहे, आयटी क्षेत्रातील विद्यार्थ्यांनी या तीन कृत्रीम भाषा आत्मसात करणे गरजेचे आहे. त्या अवगत असतील तर मोठ्या प्रमाणावर जगभरातील नोकर्या मिळण्याची संधी उपलब्ध होते.

# शारदा सेमी इंग्लिश स्कूलचे पूर्व प्राथमिक व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तीर्ण गुणवंताचे कौतुक

लातूर - शारदा सेमी इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी पुर्व प्राथमिक व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.गुणवंत विद्यार्थ्याचे कौतुक रॉयल एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ.एम.आर. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. इयत्ता पाचवी व आठवी च्या विद्यार्थ्यासाठी शिष्यवृत्ती परीक्षा राज्य शासनाच्या वतीने घेण्यात येते.या परीक्षेत शारदा सेमी स्कुलच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करून शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत.यामध्ये प्रथम शौर्य अरुण धाराशिवे द्रितीय अवधूत गोविंद जाधव तृतीय अभिजीत बालाजी बिराजदार तसेच पात्र ठरलेले विध्यार्थी सुदर्शन सुधाकर लकडे, तन्वी संजय चव्हाण, सिध्दी विजयसिंह बोराडे, रुद्रानी गंगाधर पाचेगावकर, श्रवण श्रीकांत केंद्रे, स्नेहल दत्तात्रय रामरुळे, साद रफिक सय्यद, यश बाबुराव घाडगे असे एकुण अकरा विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केले आहे.या गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक रॉयल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. एम.आर.पाटील यांच्या हस्ते कॉक्सिट कॉलेजच्या सेमिनार हॉलमध्ये करण्यात आले.यावेळी शारदा सेमी इंग्लिश स्कूलचे प्राचार्य लक्ष्मण पुरी पालक प्रतिनिधी सुचिता तांबोळकर आदी पालक विद्यार्थी व शिक्षक मोठया संख्येने उपस्थित होते. शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक स्पर्धा परीक्षा विभागाचे समन्वयक रोहित जाधव सर, मुख्य समन्वयिका अनघा पाटील, दर्शना बोराडे, मीनाक्षी सूर्यवंशी समर्जीत ढगे, लिंबराज गायकवाड किरण क्षिरसागर यांची उपस्थिती होती.डॉ एम.आर.पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले विद्यार्थ्यांनी आपले ध्येय निश्चित करून अभ्यासात सातत्य ठेवावे चिकाटी ठेवावी व उज्वल यश संपादन करावे असे आवाहन केले . पुढे ते म्हणाले पालक आणि शिक्षक यांनी जागरूक राहुन गुणवता वाढीकडे लक्ष दयावे अशा सुचनाही दिल्या.

# गृह मतदानासाठी घरी आलेल्या मतदान पथकांचे दिव्यांग, ८५ वर्षांवरील मतदारांनी मानले आभार

लातूर, दि. ०२ : मतदार यादीमध्ये नाव असलेल्या दिव्यांग आणि ८५ वर्षांपेक्षा अधिक वय असलेल्या मतदारांसाठी भारत निवडणूक आयोगाने गृह मतदानाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. त्यानुसार लातूर (अ.जा.) लोकसभा मतदारसंघातील गृह मतदानाला आज (दि. २) पासून सुरुवात झाली. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी उदगीर विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील गृह मतदान प्रक्रियेची प्रत्यक्ष पाहणी केली. गृह मतदानासाठी घरी येणाऱ्या मतदान पथकांचे आभार मानत दिव्यांग आणि ८५ वर्षांवरील मतदारांनी आपला हक्क बजाविला. वयोवृद्धता, दिव्यांगत्व यामुळे मतदान केंद्रावर जाणे शक्य होऊ शकले नसते, मात्र गृह मतदान सुविधेमुळे मतदान करता आल्याचा आनंद यावेळी अनेकांच्या चेहऱ्यावर झळकला.टपाली मतपत्रिकेची सुविधा उपलब्ध होण्यासाठी दिव्यांग आणि ८५ वर्षांवरील मतदारांकडून १७ एप्रिल २०२४ पर्यंत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्यामार्फत १२ (डी) अर्ज भरून घेण्याची कार्यवाही करण्यात आली. त्यानुसार ८५ वर्षांवरील १ हजार ८९३ आणि ४६३ दिव्यांग मतदार असे एकूण २ हजार ३५६ मतदार गृह मतदानासाठी पात्र ठरले. या मतदारांचे घरोघरी जावून मतदान करून घेण्यासाठी १३० मतदान पथके स्थापन करण्यात आली. प्रत्येक पथकात दोन मतदान अधिकारी, पोलीस कर्मचारी, व्हिडीओग्राफर आणि मायक्रो ऑब्झर्व्हर यांचा समावेश आहे. या मतदान प्रक्रियेमध्ये गोपनीयतेचा भंग होवू नये, यासाठी विशेष खबरदारी घेण्याच्या सूचना जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिल्या. त्यानुसार २ मे रोजी गृह मतदान प्रक्रिया सुरु झाली आहे.जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी स्वतः उदगीर विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील गृह मतदान प्रक्रियेची पाहणी केली. यावेळी उदगीर शहरातील ३१ वर्षीय दिव्यांग पूजा कासले यांच्या घरी त्यांनी भेट दिली. दिव्यांगत्वामुळे मतदान केंद्रावर जाणे टाळणाऱ्या पूजा कासले यांनी यावेळी गृह मतदानाद्वारे पहिल्यांदाच मतदानाचा हक्क बजाविल्याचे सांगितले. तसेच या सुविधेमुळे मतदान करता आल्याचा आनंद व्यक्त केला. उदगीरचे उपविभागीय अधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी सुशांत शिंदे, तहसीलदार राम बोरगावकर आदी यावेळी उपस्थित होते. करडखेल येथील पंढरी माणिक कसबे, दिलीप कसबे, तसेच लोहारा येथील मुक्ताबाई सोपानराव मोगले यांच्या गृह मतदानावेळी जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी उपस्थित राहून मतदान प्रक्रियेची पाहणी केली. तसेच मतदारांच्या गृह मतदानानंतरच्या भावना जाणून घेतल्या.लातूर शहरातील औसा रोड परिसरातील श्रीमती गोदावरी कुलकर्णी यांचे वय १०१ वर्षे आहे. अर्धांगवायूच्या झटक्यामुळे त्यांना गेली दोन वर्षे कोणतीही हालचाल करता येत नसल्याने अंथरुणावर पडून आहेत. त्यांना मतदान केंद्रावर घेवून येणे शक्य नव्हते, असे कुटुंबियांचे म्हणणे आहे. मात्र, गृह मतदान सुविधेमुळे यावेळी त्यांचे मतदान होवू शकल्याचे समाधान त्यांच्या कुटुंबीयांनी व्यक्त केले. यावेळी सहायक जिल्हाधिकारी नमन गोयल, लातूरच्या उपविभागीय अधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, नायब तहसीलदार गणेश सरोदे उपस्थित होते.लातूर येथील लेबर कॉलनी येथील १०४ वर्षे वयाच्या अहेमद खुदबोद्दिन शेख यांनाही आता आजारपण आणि वृद्धावस्थेमुळे घराबाहेर पडता येत नाही. त्यामुळे यावेळी मतदानाचा अधिकार बजाविण्यासाठी ते मतदान केंद्रावर आले नसते, असे त्यांचे नातू अजीम सलीम शेख यांनी सांगितले. मात्र, गृह मतदान सुविधेमुळे त्यांना मतदानाचा हक्क बजाविता आला. त्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावर हास्य खुलले. याच परिसरात राहणाऱ्या ८७ वर्षीय किसनाबाई ताकपिरे यांनीही मतदान पथकाने घरी येवून आपले मतदान करून घेतल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE